शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित,
कायम विनाअनुदानित महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय/महोदया,

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत डॉ. धनराज माने शिक्षण संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे -१ रोजीच्या पत्रान्वये सन २०१९-२० करीता विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने भरण्याची अंतिम मुदत दि. १५.१२.२०१९ पर्यत वाढविण्यात आलेली आहे. सदरहू अर्जाची महाविद्यालय स्तरावरुन पडताळणी करण्याची अंतिम मुदत दि. १६.१२.२०१९ आणि विभाग स्तरावरुन पडताळणी करण्याची अंतिम मुदत दि. २०.१२.२०१९ अशी आहे.

महाविद्यालयाच्या लिपीक व प्राचार्य तसेच विभाग स्तरावरुन अर्जाची मुदतीमध्ये पडताळणी न केल्यामुळे असे प्रलंबित राहिलेले विद्यार्थ्यांचे अर्ज सिस्टीमद्वारे आपोआप नामंजूर होतात.

विद्यापीठ/संस्था/महाविद्यालय यांच्यामधील एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीबाबत माहिती न मिळाल्यामुळे तसेच महाविद्यालयाच्या तसेच विभागीय सहसंचालक कार्यालयाच्या लॉगीनवर अर्ज पडताळणीसाठी प्रलंबित राहिल्यामुळे विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहिल. याबाबतचे सोबतचे पत्र माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी जोडले आहे.

कळावे,

आदेशान्वये

(श्री. व्ही. एस. सोयम)
उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/111

दि. 13 DEC 2019

d:\2019\mangutkar\circular.docx

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१

web: www.dhepune.gov.in
E-mail: schol.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२६९३९
फॅक्स ०२०/२६११११५३


क्र.उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/ 16097

दि. १२/१२/२०१९

तात्काळ ईमेलद्वारा

12 DEC 2019

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

**विषय :- उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने प्रभावी अंमलबजावणी करणे बावत...**

संदर्भ :- १. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/१०११४,दि. ३०.०७.२०१९
२. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/१०२०७,दि. ३१.०७.२०१९
३. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/१०६९५,दि. ९.०८.२०१९
४. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/१०८०२,दि. २०.०८.२०१९
५. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/१३५६९,दि. ७.१०.२०१९
६. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/१३८३४,दि. १५.१०.२०१९
७. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/१४२६२,दि. १.११.२०१९
८. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/१४३४५,दि. ४.११.२०१९
९. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/१४५१०,दि. ६.११.२०१९
१०. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/१४६८२,दि. १३.११.२०१९
११. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/१४८२३,दि. १६.११.२०१९
१२. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/१२२७५,दि. २६.११.२०१९

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्यशासनाच्या शिष्यवृत्ती योजनांची महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येत आहे. विद्यार्थी / महाविद्यालयांच्या मदतीसाठी डीबीटी पोर्टलवर व्हिडीओ, मॅन्युअल उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. तसेच संदर्भिय संचालनालयाच्या पत्रान्वये वेळोवेळी लेखी सूचना देण्यात आलेल्या आहेत.

**सन २०१९-२० करीता विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने भरण्याची अंतिम मुदत दि. १५.१२.२०१९ पर्यंत वाढविण्यात आलेली असून, सदरची बाब सर्व पात्र विद्यार्थ्यांना त्यांचे महाविद्यालयामार्फत कळविण्यात यावी. तसेच सदरहू अर्जांची महाविद्यालय स्तरावरुन पडताळणी करण्याची अंतिम मुदत दि. १६.१२.२०१९ आणि विभाग स्तरावरुन पडताळणी करण्याची अंतिम मुदत दि. २०.१२.२०१९ अशी आहे.**

महाविद्यालयाच्या लिपीक व प्राचार्य तसेच विभाग स्तरावरुन अर्जांची मुदतीमध्ये पडताळणी न केल्यामुळे असे प्रलंबित राहीलेले विद्यार्थ्यांचे अर्ज सिस्टीमद्वारे आपोआप नामंजूर होतात.

विद्यापीठ / संस्था / महाविद्यालय यांच्यामधील एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीबाबत माहिती न मिळाल्यामुळे तसेच महाविद्यालयाच्या तसेच विभागीय सहसंचालक कार्यालयाच्या लॉगीनवर अर्ज पडताळणीसाठी प्रलंबित राहील्यामुळे विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहील्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्य, विद्यापीठांचे कुलसचिव तसेच संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांची राहील. याची नोंद घ्यावी.

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत :- १. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सादर.
२. सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.
३. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.
४. प्राचार्य, सर्व शासकीय,अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.